ePaper

# काँग्रेस नेते अधीर रंजन चौधरी लोकसभेतून निलंबित!




| वर्ष - 7 । अंक - 100 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- 'ही' तारीख लक्षात ठेवलीच पाहिजे
- रजनीकांत यांचा जेलर हाउसफुल
- राज्यातील हिंसाचार लज्जास्पद
- अदाणींसाठी मणिपूरमध्ये हिंसाचार

www.mahaenews.com । शुक्रवार, दिनांक 11 ऑगस्ट 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# पुनावळेतील कचरा डेपोला ग्रामस्थांचा विरोध!



## » ग्रामस्थांचे आयुक्तांना निवेदन : प्रशासन म्हणते... 'शहराची गरज आहे'

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने पुनावळे येथे प्रस्तावित कचरा डेपोला ग्रामस्थांनी विरोध केला आहे. याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. त्यामुळे पुनावळेचा कचरा डेपोचा मुद्दा पेटण्याची शक्यता आहे. महापालिका शिक्षण मंडळाचे माजी सभापती चेतन भुजबळ यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची महापालिकेत भेट घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिलेल्या निवेदनाची प्रत दिली. यावेळी विशाल काटे, शिवाजी बांदल, अतुल काटे, सचिन काटे, संतोष ढवळे आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते.**

भुजबळ यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीमध्ये असलेल्या पुनावळे येथे महाराष्ट्र शासन वनविभागाची 26 हेक्टर जागा आहे. या जागेवर प्रशासनाने मागणी केल्यामुळे सदर जागा महापालिकेकडे हस्तांतरित केली आहे. या जागेवर महापालिका प्रशासनाने 2008 रोजी कचरा डेपोसाठी आरक्षण टाकले आहे. 2008 रोजी पुनावळे येथे नागरीकरण झाले नव्हते. लोकवस्ती देखील कमी प्रमाणात होती. मात्र, गेल्या 15 वर्षांत या भागात विविध शैक्षणिक संस्था, मोठे गृह प्रकल्प, शेजारी हिंजवडी आयटी पार्कसह विविध सोयी-सुविधांनी सज्ज असा हा परिसर झाला आहे. पुनावळे येथे देशभरातील अनेक नागरिक नोकरी आणि व्यवसायानिमित्त स्थायिक झाले आहेत.

### पाणी पुरवठा दुषित होण्याची शक्यता...

सध्या या उपनगराची लोकसंख्या जवळपास एक लाखाच्या आसपास झाली आहे. सध्य परिस्थितीत पुनावळे येथे कचरा डेपो झाल्यास येथील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात निर्माण होण्याची भिती आहे. तसेच रावेत येथील बंधाऱ्यामधून संपूर्ण पिंपरी चिंचवड शहरास पाणीपुरवठा केला जातो. या कचरा डेपोमुळे शहरातील सर्व नागरिकांना दुषित पाणी पुरवठा होण्याची दाट शक्यता आहे.

### कचरा डेपो रद्द करा...

सध्या वनविभागाच्या 26 हेक्टर जागेवरती अनेक प्रकारची दाट वृक्षे आहेत. सदर कचरा डेपो येथे निर्माण केल्यास या जागेवरील संपूर्ण वृक्ष तोड करावी लागेल. त्यामुळे पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी होणार आहे. तरी या सर्व बाबी विचारात घेवून पुनावळे येथे प्रस्तावित असणारा कचरा डेपो रद्द करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली. सर्व नागरिक आणि ग्रामस्थांच्या भावनांचा विचार करून सदर प्रस्तावित कचरा डेपो रद्द करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी या वेळी निवेदनाद्वारे करण्यात आली



### शिष्टमंडळ पुन्हा आयुक्तांना भेटणार



» दरम्यान, पुनावळेतील श्री भैरवनाथ मंदिरात स्थानिक नागरिक, सोसायटीधारक, ग्रामस्थ यांची बैठक दोन दिवसांपूर्वी झाली. यामध्ये कचरा प्रकल्पाला विरोध आणि आंदोलनाची दिशा ठरवण्यात आली आहे. त्यानुसार, स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मार्गदर्शनाखाली कचरा प्रकल्प विरोधी कृती समितीची स्थापना करण्यात येणार आहे. त्याद्वारे महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि शहरातील सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी तसेच आमदार, खासदार यांना प्रत्यक्ष भेटून निवेदन देण्यात येणार आहे. कचरा प्रकल्प ही शहराची गरज असली, तरी स्थानिक भौगोलिक परिस्थितीचा विचार करता पुनावळे, ताथवडे, वाकड आणि रावेत भागातील नागरिकांसाठी कचरा प्रकल्प त्रासदायक ठरणार आहे, असा दावा ग्रामस्थांनी केला आहे.

### प्रशासनाची भूमिका काय?

» पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या ३० लाखांच्या घरात आहे. मोशी येथील कचरा डेपोवर 'वेस्ट टू एनर्जी', बायोमायनिंग, सीएन्डडी वेस्ट असे प्रकल्प राबवून कचरा समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेतला जात आहे. शहराची गरज ओळखून पुनावळेतील कचरा प्रकल्प कार्यान्वयीत करणे, काळाची गरज आहे. त्यामुळे कचरा डेपो रद्द करता येणार नाही. तसेच, कचरा डेपो म्हणजे कचरा त्या जागेवर साठवला जाणार नाही. आधी प्रकल्प सुरू केला जाईल. त्यानंतर कचरा त्या ठिकणी आणला जाणार आहे. मोशीतील परिस्थिती वेगळी होती. त्या ठिकाणी ३० वर्षांपासून कचरा साचला होता. पर्यावरणाचा ऱ्हास किंवा भूजलप्रदूषण होणार नाही. याबाबत स्थानिक नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे, असा दावा महापालिका प्रशासनाकडून केला जात आहे. त्यामुळे फुरसुंगी, मोशी प्रमाणे पुनावळेतील कचरा प्रकल्पाबाबतही स्थानिक नागरिक आणि प्रशासन असा वाद निर्माण होणार आहे.

# पर्यावरण हिताचा कायदा लागू करा!

## » उद्धव बाळासाहेब ठाकरे गटातर्फे पुण्यात आंदोलन



। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाविकास आघाडी सरकारच्या काळात तत्कालीन पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी पर्यावरणाच्या हिताचा हेरिटेज-ट्री आणि 200 हून अधिक वृक्षतोडीवर नियंत्रणासाठी कायदा अमलात आणला होता . महाराष्ट्र वृक्ष प्राधिकरण स्थापन करुन अवैद्य वृक्षतोडीवर आळा बसविणारा हा कायदा लोकप्रिय झाला होता .**

आत्ताच्या त्रिकुट सरकारने विकासला विरोध म्हणून हा कायदा रद्द करुन वृक्ष तोडीचे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थानाच दिले आहे. त्यामुळे असंख्य वृक्षतोड होणार असून या विरोधात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने गुरुवारी जिल्हाधिकारी पुणे कार्यालयावर आंदोलन करण्यात आले तसेच निवेदन ही देण्यात आले शहरप्रमुख संजय मोरे म्हणाले, महाराष्ट्रातील वृक्षांच संवर्धन व्हावं आणि या महाराष्ट्र सुजलाम रहावा. हिरवाई अशीच कायम टिकून रहावी, म्हणून नवीन कायदा अमलात आणला होता. आणि त्याद्वारे महाराष्ट्रातील झाडांची कत्तल थांबणार होती. सर्व थरातून या नवीन कायद्याच कौतुक झालं होत. आदित्य ठाकरेंच झालेल कौतुक या आताच्या चालू त्रि कुटील सरकारला बघवल गेल नाही म्हणून अधिवेशनामध्ये या सरकारने नवीन विधेयक आणून मविआने केलेला कायदा रद्दबादल ठरवण्यात आला. त्याचा या ठिकाणी आम्ही निषेध करतो, धिक्कार करतो. तत्कालीन पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्या संकल्पनेतून केलेला कायदा जर अमलात आला असता आणि टिकला असता तर या महाराष्ट्रातील संपूर्ण झाडे सांभाळली गेली असती, पुण्यातील वेताळ टेकडीवरील झाडे असतील, नदी सुधार प्रकल्पातील जी साडेसात हजार झाडांची कत्तल होणार आहे ती थांबण्यासाठी मदत झाली असती. पर्यावरणाचा होणारा र्हास थांबण्यास मदत झाली असती. थरकुडे म्हणाले पुण्यातील पर्यावरण म्हणून आदित्य ठाकरे हे आग्रही होते.

### यांची होती उपस्थिती

» याप्रसंगी शहरप्रमुख संजय मोरे, गजानन थरकुडे, महिला शहरसंघटिका संगिता ठोसर, पल्लवी जावळे, उपशहरप्रमुख बाळा ओसवाल, भरत कुंभारकर, तानाजी लोणकर, अनंत घरत, उमेश गालिंदे, उमेश वाघ, विश्वास चव्हाण, रविंद्र मुजुमले, विधानसभाप्रमुख उत्तम भुजबळ, राजेंद्र बाबर, नितीन शिंदे, रामदास गायकवाड, विभाग प्रमुख राजेश मोरे, संतोष सोनवणे, अतुल गोंदकर तसेच इतर शिवसैनिक उपस्थित होते .

# पत्नीला विवस्त्र करून नाचायला लावले

## » चित्रीकरण करणाऱ्या पतीवर गुन्हा दाखल

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील नाना पेठ परिसरात राहणाऱ्या एका व्यक्तीने स्वतःच्या पत्नीला राहत्या घरात विवस्त्र करून, तिला नाचायला भाग पाडत त्याचे चित्रीकरण करून तिने तिच्या कृत्यास विरोध केला असता, सदर चित्रफीत सोशल मीडियावर प्रसिद्ध करण्याची धमकी देऊन तिला शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार घडला आहे. याबाबत 31 वर्षीय महिलेने तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी 35 वर्षीय तिच्या पती विरोधात समर्थ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.**




याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ,आरोपी हा तक्रारदार महिलेचा पती आहे .आरोपीने तक्रारदार यांचा मानसिक व शारीरिक छळ करून मोबाईल मध्ये असलेल्या अश्लील चित्रफित त्यांना दाखवल्या. तसेच अश्लील चित्रफित प्रमाणे त्यांना शारीरिक संबंध करण्यास भाग पाडले. त्याचप्रमाणे त्यांना विवस्त्र अवस्थेत नाचायला लावून त्याचे चित्रीकरण केले. त्याचप्रमाणे पत्नीच्या चारित्र्यावर वेळोवेळी संशय घेऊन तिचे स्त्रीधन काढून घेत तिला घराबाहेर काढून रात्री अपरात्री फोन करून शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली आहे. त्याचप्रमाणे डिसेंबर 2015 मध्ये महिला ही माहेरी असताना, घरी कोणी नसताना आरोपीने तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. तसेच तिची बहीण काम करत असलेल्या ठिकाणी ती सेक्स रॅकेट चालवत आहे अशा आशयाचे पत्र पाठवून तिची बदनामी केली आहे. याप्रकरणी संबंधित महिलेने तक्रार पोलिसांकडे दाखल केल्यानंतर समर्थ पोलिस ठाण्यात आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक एस वाघमारे याबाबत पुढील तपास करत आहे.

### पतीची पत्नीकडे मागणी

» लग्न झाल्यानंतर एक महिला सासरी नांदत असताना तिच्या पतीने तिला वेगवेगळ्या कारणावरून वेळोवेळी शिवीगाळ केला. तसेच माहेरून फ्लॅटसाठी दहा लाख रुपये घेऊन ये असे सांगून तिला दारू पिऊन मारहाण करून जीवे ठार मारण्याची धमकी दिली. तसेच तिचा मानसिक शारीरिक छळ करून तिच्यावर कौटुंबिक अत्याचार करण्यात आले आहे. या प्रकरणी 39 वर्षीय महिलेने सिंहगड रोड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर महिलेचा पती ,सासू-सासरे आणि दिर यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भिडेंविरुद्ध डेक्कन पोलीस ठाण्यात तक्रार

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।



महात्मा गांधी यांच्याविषयी केलेल्या आक्षेपार्ह विधानाच्या निषेधार्थ शिवप्रतिष्ठानचे संस्थापक मनोहर कुलकर्णी उर्फ संभाजी भिडे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांनी गुरुवारी केली.

तुषार गांधी यांनी संभाजी भिडे यांच्याविरोधात डेक्कन पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. दरम्यान, या तक्रारीवर कायदे तज्ज्ञांचे मत घेऊन योग्य ती कायदेशीर कारवाई केली जाईल, असे पोलिसांकडून सांगण्यात आले.

तुषार गांधी म्हणाले, संभाजी भिडे यांनी महात्मा गांधी आणि त्यांच्या कुटुंबाच्या चारित्र्यावर हल्ला केला. त्यामुळे आम्ही प्रचंड व्यथित झालो आहोत. गांधीवादी संघटनांसोबत मिळून आज आम्ही ॲड. असीम सरोदे यांच्यामार्फत पोलिसांकडे तक्रार केली आहे. पोलीस जबाबदारीने कारवाई करतील, अशी आम्हाला आशा आहे. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन संभाजी भिडे आणि त्यांची संघटना तसेच अमरावतीतील ज्या कार्यक्रमात भिडेंनी महात्मा गांधींविषयी वादग्रस्त वक्तव्य केले.


# आमदार महेश लांडगे यांचे वाढलेय पॉलिटिकल मायलेज!



## पिंपरी-चिंचवडच्या परिघाबाहेर सीमोल्लंघन करणारा पहिला स्थानिक नेता

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भोसरी विधानसभेतील आमदार महेश लांडगे हे पिंपरी-चिंचवडसह संपूर्ण राज्यातील तरुणांच्या गळ्यातील ताईत बनले आहेत. त्याला निमित्त होते विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनाचे. औरंगजेबाचे उदात्तीकरण होत असल्याबाबत आमदार अबू आझमी यांच्यावर आ. लांडगे यांनी संताप व्यक्त करत छत्रपती शिवाजी महाराजांविषयी दाखवलेले प्रेम तरूणांना प्रेरणादायी ठरले. यासह शहरात वेस्ट टू एनर्जीसह राबविलेले विविध उपक्रम आणि त्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतली दखल कौतुकास्पद आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवड शहरासह संपूर्ण राज्यात आमदार लांडगे यांचे "पॉलिटिकल मायलेज" वाढत असल्याचे चित्र आहे.**





२०१४ च्या विधानसभा निवडणुकीत भोसरी विधानसभेत बलाढ्य नेता असणाऱ्या तसेच पिंपरी-चिंचवडमधील 'राजकीय चाणक्य' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माजी आमदार विलास लांडे यांचा पराभव करत आमदार लांडगे यांनी विधानसभेत आपली 'दमदार एन्ट्री' केली. त्यावेळी मारलेल्या मुसंडीची पुणे जिल्ह्याच्या राजकारणात चर्चा झाली होती. प्रचंड मोदी लाटेत लांडगे अपक्ष निवडणूक लढवित मिळविलेले भरघोस मताधिक्क्याने विजयी झाले होते. तेव्हापासून आमदार लांडगे यांनी मागे वळून पाहिले नाही. या मतदारसंघात दुसऱ्यांदा मतदारांनी त्यांना भरघोस मतांनी विजयी केले.

मतदारसंघाचे प्रतिनिधीत्त्व करत असताना राज्याने आदर्श घ्यावा, असे प्रकल्प राबविण्यासाठी ते आग्रही राहिले आहेत. त्यासाठी जागतिक स्तरावरील कबड्डी, कुस्ती क्रीडा संकुलाच्या निर्मितीसाठी त्यांनी पाठपुरावा केला आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट आणि बहुउद्देशीय क्रीडा संकूल उभारणीसाठी त्यांनी पाठपुरावा सुरू केला आहे. पिंपरी-चिंचवड शहराचा गेल्या ३० वर्षांपासून प्रलंबित असलेला कचरा प्रश्न सोडवण्यासाठी आमदार लांडगे यांनी कचऱ्यापासून वीजनिर्मितीचा अनोखा उपक्रम त्यांनी आपल्या मतदारसंघात सुरू केला. त्यामुळे पर्यावरणाची हानी टळणार आहे. तसेच नागरिकांची कचऱ्यापासून मुक्तता होणार आहे. कचऱ्यापासून वीज निर्मिती करणारा हा राज्यातील पहिला प्रकल्प ठरला आहे. या प्रकल्पाचे नुकतेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन झाले. त्यामध्ये पंतप्रधान मोदी यांनी या प्रकल्पाचे कौतुक केले. त्यामुळे "पिंपरी-चिंचवड मॉडेल" ची चर्चा राज्यासह परराज्यातही होवू लागली आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात अनेक मातब्बर नेते निर्माण झाले. यामध्ये स्व. अण्णासाहेब मगर, माजी आमदार ज्ञानेश्वर लांडगे, स्व. अंकुशराव लांडगे, प्रा. स्व. रामकृष्ण मोरे, स्व. लक्ष्मण जगताप, विद्यमान खासदार श्रीरंग बारणे, माजी आमदार विलास लांडे यांची नावे अग्रक्रमाने घ्यावी लागतील. मात्र, स्व. रामकृष्ण मोरे यांच्यानंतर शहराचे नेतृत्व राज्याच्या राजकारणात करण्याची संधी एकाही स्थानिक नेत्याला मिळाली नाही. स्व. लक्ष्मण जगताप आणि माजी आमदार विलास लांडे हे प्रचंड क्षमता असलेले नेते होते. मात्र, शहरावर राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांचा एकछत्री अंमल राहिला. त्यामुळे पिंपरी-चिंचवड शहराचे निर्णय अजित पवार यांच्याच अधिकारात झाले. मात्र, २०१७ पासून स्व. लक्ष्मण जगताप आणि आमदार महेश लांडगे यांनी शहराचे निर्णय घेण्यास सुरूवात केली. दुर्दैवाने मुरब्बी नेते जगताप कालवश झाले. अन्य नेत्यांनीही आपले राजकीय वलय निर्माण केलेच. मात्र, त्यांचे वलय केवळ पिंपरी-चिंचवड शहरापुरेतेच सीमित राहिल्याची वस्तूस्थिती आहे. आमदार महेश लांडगे यांनी केलेल्या अनेक उल्लेखनीय उपक्रमांमुळे, विधानसभेत उपस्थितीत केलेल्या मुद्द्यांमुळे ते राज्याच्या प्रभावशाली नेतृत्त्वाच्या यादीत बसले. त्याला विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी

### महापूर : पश्चिम महाराष्ट्राच्या जनतेला आधार...

» दोन वर्षांपूर्वी पावसाळ्यात पश्चिम महाराष्ट्राला पुराचा मोठा वेढा होता. अनेक कुटुंब उद्ध्वस्त झाली होती. नागरिकांच्या घरात पाणी जाऊन जनजीवन विस्कळीत झाले होते. या वेळी आमदार लांडगे यांनी धान्य, दैनंदिन उपयोगाच्या वस्तूंचे ट्रक भरून पश्चिम महाराष्ट्राकडे पाठविले. नागरिकांना आधार देण्याच्या त्यांनी हाती घेतलेल्या 'एक हात मदतीचा" उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक झाले.

### बैलगाडा शर्यत: न्यायालयीन लढ्याचे सूत्रधार...

» बैलगाडा शर्यत सुरू करण्यासाठी आमदार महेश लांडगे यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्याला यश देखील मिळाले. ज्या वेळी बैलगाडा शर्यत बंदी होती. त्या वेळी सांगलीतील आटपाडीमध्ये आमदार गोपीचंद पडळकर यांनी बैलगाडा शर्यतीचे मोठ्या प्रमाणात आयोजन केले होते. पोलिसांनी तिथे जाण्याला बंदी घातली होती. या वेळी वेशभूषा बदलून वाट काढत आमदार महेश लांडगे यांनी या कार्यक्रमाला लावलेली उपस्थिती सर्व माध्यमासह राज्यभरात चर्चेचा विषय ठरला.

» यापुढे बैलगाडा शर्यतींवरील बंदी उठवण्याबाबत अखिल भारतीय बैलगाडा संघटनेच्या पुढाकाराने न्यायालयीन लढाई सुरू झाली. त्याचे खरे सूत्रधार आमदार लांडगे राहिले आणि ही लढाई त्यांनी जिंकली. विशेष म्हणजे, भारतातील सर्वात मोठी बैलगाडा शर्यत भरवून लांडगे राज्यातील शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचले आहेत.

### छत्रपतींशी निष्ठा..अन् विधानसभेतील गाजलेले भाषण...

» नुकत्याच झालेल्या पावसाळी अधिवेशनात महामानवांच्या अवमानबाबत सुरू असलेल्या चर्चेत समाजवादी पक्षाचे नेते अबू आझमी यांनी वादाला तोंड फोडले. त्यानंतर आमदार नितेश राणे आणि आमदार महेश लांडगे यांनी आझमी यांना धारेवर धरले. "छत्रपती शिवाजी महाराजांना मानतो..मग, औरंग्याला कशाला गळ्याला लावतो..." अशी प्रचंड आक्रमक पवित्रा घेणारे आमदार लांडगे यांच्या व्हीडिओचे स्टेटस महाराष्ट्रातील घराघरात पोहोचले. शिव-शंभू प्रेमींनी राजकीय अभिनिवेश न ठेवता लांडगे यांच्या भूमिकेचे स्वागत केले.

» दुसरीकडे, छत्रपती संभाजी महाराज यांचा जगातील सर्वांत उंच पुतळा अर्थात "स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण" पिंपरी-चिंचवडमध्ये उभारण्याचे काम लांडगे यांनी हाती घेतले आहे. त्यामुळे लांडगे यांची चर्चा महाराष्ट्रातील घरांघरांत होवू लागली आहे.




**खनिज ऊर्जास्रोतांचा वापर हे जागतिक तापमानवाढीचे आणि पर्यायाने हवामान बदलांचेही महत्त्वाचे कारण आहे. भारताला त्यातून अर्थकारण आणि पर्यावरण या दोन्ही आघाड्यांवर झळ सोसावी लागत आहे. जैवइंधनांचा पर्याय स्वीकारल्यास विकसित देश होण्याचे आपले स्वप्न साकार होऊ शकेल. आजच्या जागतिक जैवइंधन दिनानिमित्त या ऊर्जा संक्रमणाच्या शक्यता व संधींचा आढावा..**

# इंधनालाही सुगंध मातीचा!




'वेस्ट इजन्ट वेस्ट अनटिल वुई वेस्ट इट.' टाकाऊ हे टाकाऊ मानलेच नाही, तर त्यातूनही टिकाऊ असेच काही निर्माण होऊ शकते, याची हे वचन कायम आठवण करून देते. अशी सकारात्मक आणि शाश्वत विकासाची दृष्टी काय साधू शकते, याविषयीची आता जगभर जागरूकता येऊ लागली आहे. अर्थकारण आणि पर्यावरण ही विकासाची दोन चाके एकदिशा आणि एकगतीने जाणे अपेक्षित असते. त्यामध्ये अर्थकारणाला अधिक महत्त्व येऊन पर्यावरणाची हानी होत राहिल्याने तापमानवाढ आणि अन्य स्वरूपांतील हवामान बदलांच्या दुष्परिणामांनी जग होरपळू लागले आहे. यंदाचा जुलै महिना जगाच्या अनेक भागांत अतिउष्म्याचा आणि काही भागांत अतिवृष्टीचा ठरला. अमेरिकेच्या नैर्ऋत्येपासून युरोपचा मोठा भाग आणि चीन-जपानपर्यंतचे भाग होरपळले. जगाच्या तापमाननोंदींच्या इतिहासातील हा सर्वाधिक उष्ण महिना ठरला. याच जुलैमध्ये आपली राजधानी दिल्लीने ४० वर्षांतील सर्वात भीषण पूरस्थिती आणि ऑगस्टच्या सुरुवातीला चीनची राजधानी बीजिंगने १४० वर्षांतील सर्वाधिक तीव्र पर्जन्यवृष्टी अनुभवली. दरवर्षी हिवाळ्याच्या तोंडावर शेतकचरा जाळल्याने उत्तरेकडील राज्यांत होणाऱ्या प्रदूषणाचे स्मरण या आपत्तीत स्वाभाविक होते. बीजिंगने तर यंदाच्या मार्चमध्ये जागतिक आरोग्य संघटनेने निश्चित केलेल्या निकषापेक्षा ३७ पटींनी अधिक प्रदूषणाचा स्तर गाठला होता. भारताचे वर्णन नेहमी खंडप्राय देश असे केले जाते, एवढी विविधता आपल्या देशात आहे. परंतु, हीच विविधता हवामान बदलांच्या दुष्परिणामांच्या रूपात मोठी झळ पोहोचवू शकते, असा इशारा रिझर्व्ह बँकेने दिला आहे. 'रिपोर्ट ऑन करन्सी अँड फायनान्स टोवर्डस ग्रीनर, क्लीनर इंडिया' या शीर्षकाखालील यासंबंधीचा अहवाल मे २०२३ मध्ये प्रकाशित झाला. त्यानुसार, हवामान बदलांची झळ भौगोलिकदृष्ट्या सहा वेगवेगळ्या कारणांनी बसू शकते. हिमालयाच्या सान्निध्यातील भूभागाला भूस्खलन, ढगफुटी व हिमनग वितळण्याच्या रूपात आणि गंगेच्या खोऱ्यात नद्यांचे महापूर, उष्णतेच्या लाटा व वादळी पाऊस अशा रूपात हे परिणाम असू शकतात. थरच्या वाळवंटात उष्णतेच्या लाटा हेच कारण जीवित व वित्तहानी, स्थलांतरास कारण ठरू शकते. किनारपट्टी व घाट प्रदेशांत अतिवृष्टी, शहरांमधील पूरस्थिती, वादळे व दरडी कोसळणे आणि मध्यवर्ती पठारी प्रदेशांत उष्णतेच्या लाटा, वनक्षेत्रांतील आगी व दुष्काळ या स्वरूपांत या दुष्परिणामांना सामोरे जावे लागू शकते, असे या अहवालात म्हटले आहे. हवामानबदलांचे आर्थिक परिणामही भयावह आहेत. उष्णतेच्या लाटांमुळे जगभर २०३० पर्यंत सुमारे आठ कोटी नोकऱ्यांवर गंडांतर येणार आहे आणि त्यांपैकी ३.४ कोटी नोकऱ्या एकट्या भारतातील असू शकतात. रिझर्व्ह बँकेच्या अहवालानुसार, अतिउष्मा आणि दमट हवामानामुळे २०३० पर्यंत भारतात जे कामाचे मनुष्यतास वाया जाणार आहेत, त्यामुळे जीडीपीत ४.५ टक्के घट होण्याचा धोका आहे.

भारत हा जगातील सर्वाधिक म्हणजे १८ टक्के लोकसंख्या असलेला, जगात तिसऱ्या क्रमांकाने ऊर्जेचा वापर करणारा, परंतु जगाच्या ऊर्जास्रोतांपैकी एक टक्का स्रोतही हाती नसलेला देश आहे. ऊर्जेची मागणी वाढतच जाणार आहे. आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थेच्या अंदाजानुसार, २०४० पर्यंत आपला खनिज ऊर्जा आयातीवरील खर्च सध्याच्या तीन पट होण्याची शक्यता आहे. आपण जगातील तिसऱ्या क्रमांकाची वाहनांची बाजारपेठ झालो आहोत. या वाढीच्या तुलनेत विजेवरील वाहनांसाठीची परिसंस्था आपल्याकडे विकसित होत नसल्याने २०३० पर्यंत एकूण मागणीच्या ३० टक्के एवढीच विजेवर चालणारी वाहने असतील, असा अंदाज आहे. त्यांसाठीच्या वीजनिर्मितीचा स्रोतही मोठ्या प्रमाणावर खनिज ऊर्जेचा राहण्याची शक्यता आहे.

## संपादकीय »

### सर्वाधिकार संगीत

***खरोखरच बहुतेकांचे कान या नकारघंटांनी किटूनही गेले असतील, हे नेमके ओळखूनच सरकारने आता सर्वाधिकाराचे संगीत सुरू केले असावे.***

सध्याचे युग हे माहितीयुग, त्यात डेटा अर्थात विदा हे या नव्या युगातले नवे सोने, अशा अलंकारिक वचनांना काळी बाजूही असते. सोन्यासाठी जो काही खूनखराबा, डाकादरोडे होतात ते विदेसाठीही या ना त्या स्वरूपात होणार, ही ती बाजू. खूनदरोड्यांपासून नागरिकांस संरक्षण देऊ करणाऱ्या सरकारने लोकांच्या डेटाचेही संरक्षण करावे, ही अपेक्षा त्यामुळे रास्त. मात्र सोनेनाणे वा पैशाअडक्याला सरकार विनाअट संरक्षण देते. 'तुमच्याकडचे सारेच सोने 'राष्ट्रीय हिता'साठी वापरण्याची मुभा सरकारी यंत्रणांना द्या- आम्ही निवडू त्याच सराफांकडून सोने खरेदी करा आणि आम्ही सांगू त्याच प्रकारचे दागिने बनवून घ्या.. या अटी पाळणाऱ्यांच्याच घरांवर दरोडा पडल्यास त्यांचीच तक्रार पोलीस नोंदवतील- बाकीच्यांची नाही,' असा कोणताही जाच सरकार कधी करत नाही. विदा संरक्षणात मात्र सरकार अशा प्रकारच्या अटी घालते आहे.

**शेतकऱ्यांनी सरकारकडे काही मागावे आणि सरकारने विनाआडकाठी ते द्यावे, असे घडले तर तेच नवल. शेतकरी प्रत्यक्षात मागतो एक आणि सरकार देते भलतेच! राज्यातील शेतकरी एकीकडे अपुऱ्या आणि अवेळी येणाऱ्या पावसामुळे त्रस्त असतात.**

# चोर सोडून संन्याशाला शिक्षा..!

दुसरीकडे त्यांच्या डोक्यावर सतत बनावट कीटकनाशके आणि बोगस बियाण्यांची टांगती तलवार असते. अशा स्थितीत सरकारी पातळीवर अशी कीटकनाशके आणि बोगस बियाणे तयार करणाऱ्या कंपन्या आणि वितरक यांच्यावर कठोर कारवाई करण्याऐवजी शेतकऱ्यांनाही वेठीस धरणे हे खरे तर अन्यायकारक म्हटले पाहिजे. कोणताही शेतकरी मुद्दामहून बोगस बियाणे विकत घेऊन त्याची लागवड करणार नाही किंवा त्यावर बनावट रासायनिक फवारणी करणार नाही. परंतु त्यालाच खरेदीदार म्हणून दोषी ठरवणे म्हणजे चोर सोडून संन्याशाला फाशी देण्यासारखा प्रकार झाला. बनावट कीटकनाशकांची आयात, उत्पादन आणि विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाईची तरतूद असणारे विधेयक विधानसभेत मांडण्याऐवजी उफराटा न्याय देत, बनावट कीटकनाशकांचा शेतीमध्ये वापर करणारे शेतकरी हे गुन्हेगार असून, त्यांना थेट तुरुंगातच



डांबण्याची शिक्षा देण्याची तरतूद करणारे हे विधेयक मांडून राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या भावनांशी खेळण्याचाच प्रयत्न केला आहे. राज्यात खरिपात सुमारे दीड कोटी हेक्टर आणि रब्बीत सुमारे ५० लाख हेक्टरवर शेती होते.

राज्य फळे, फुले, भाजीपाला उत्पादनात देशात आघाडीवर आहे. शेतीतील अनेक नवनवे प्रयोग राज्यात होत आहेत; पण शेतकऱ्यांना अनेकदा बनावट खते, बियाणे, कीडनाशकांचा वापर करावा लागतो. ऐन खरीप, रब्बी हंगामात दर्जेदार बियाणांची टंचाई होते किंवा विक्रेते टंचाई असल्याचे भासवतात. त्यामुळे राज्याबाहेरून कमी दर्जाचे बियाणे राज्यात येते. खतांच्याबाबतही हेच होत आहे. रासायनिक खतांच्या दर्जाबाबत नेहमीच साशंकता व्यक्त केली जात आहे. विद्राव्य खतांवर (पाण्यात विरघळणारे) कृषी विभागाचे तोकडे नियंत्रण आहे. जैविक खते, कीडनाशकांचा दर्जा काय असावा, नियंत्रण कसे असावे, याबाबत अद्याप ठोस निर्णय झालेला नाही. कीडनाशके किंवा कीटकनाशकांबाबत यापेक्षा वेगळी स्थिती नाही. बाजारात, प्रसारमाध्यमांवर जाहिरातींचा भडिमार करायचा, शेतकऱ्यांवर कीडनाशके खरेदीसाठी भुरळ पाडायची, असा गोरखधंदा गेली काही वर्षे सर्रास सुरू आहे. शेतकरी वापरत असलेली कीडनाशके कोणी आयात केली, कोणी उत्पादित केली आणि कोणी वितरित केली, याची कोणतीच ठोस माहिती कृषी विभागाकडे नसते. हजारो रुपये खर्चून वापरलेल्या कीडनाशकांचा कोणताच परिणाम पिकांवर होत नाही. त्यामुळे किडीचा प्रादुर्भाव होऊन संपूर्ण पीकच हातचे जाते.

## ।। अभंगवाणी ।।



आहांच वाहांच आंत वरी दोन्ही ।
न लगा गडणी आम्हां तैसा ॥१॥

भेऊं नये तेथें भेडसावूं कोणा ।
आवरूनि मना बंद द्यावा ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# विरोधकांचे स्वत:चेच वस्त्रहरण

## » मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा विरोधकांवर हल्ला

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**संसदेत मोदी सरकारविरोधात अविश्वास ठराव सादर करून विरोधक स्वतःचेच 'वस्त्रहरण' करून घेत आहेत. त्यांच्या छातीत धडकी भरली आहे. जगभरात पंतप्रधानांच्या नेतृत्वाला मिळणारी मान्यता पाहून विरोधकांचा जळफळाट सुरू आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधी पक्षांवर निशाणा साधला आहे.**

नरेंद्र मोदी सरकारविरोधात सादर करण्यात आलेल्या अविश्वास ठरावावर संसदेत सत्ताधारी व विरोधकांत घमासान सुरू आहे. या प्रस्तावाला पंतप्रधान नरेंद्र मोदी गुरुवारी उत्तर देणार आहेत. यावेळीही संसदेचे वातावरण तापण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी एका ट्विटद्वारे विरोधकांवर हल्ला चढवला आहे. देशभरात विश्वास गमावलेल्या विरोधी पक्षाने संसदेमध्ये अविश्वास ठराव मांडलाय. खरं तर या ठरावावर चर्चा घडवून विरोधक स्वतःचेच 'वस्त्रहरण' करून घेत आहेत. देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने देशभरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकास आणि सुधारणांचा धडाका लावलेला आहे. त्यामुळे विरोधकांच्या छातीत धडकी भरली आहे, असे शिंदे म्हणाले. कॉंग्रेसच्या ५५-६० वर्षांच्या कालखंडात जेवढी विकासकामे झाली नाहीत, त्यापेक्षा अधिक विकास गेल्या ९ वर्षांत झाला आहे. जगभरात पंतप्रधानांच्या नेतृत्वाला जी मान्यता मिळत आहे, ती पाहून विरोधकांचा जळफळाट झाला आहे, असे ते म्हणाले. मुख्यमंत्री शिंदे पुढे आपल्या ट्विटमध्ये म्हणतात की, देशातील जनतेने विरोधकांवर वारंवार



अविश्वास दाखवलाय. 2014 आणि 2019 मध्ये सामान्य नागरिकांचा प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी यांच्यावरील प्रगाढ विश्वास दिसून आला. 2024 साली तो वृद्धिंगत होईल, याबाबत कुणाच्याही मनात शंका नाही.

### विरोधक कालबाह्य झाले

» भारताच्या नागरिकांना आता फक्त सर्वांगीण प्रगती आणि आर्थिक विकास हवा आहे. एकमेकांचे हात हाती घेऊन ऐक्याच्या घोषणा देणारे आणि पायात पाय घालून पाडण्याची संधी शोधणारे विरोधक आता कालबाह्य झाले आहेत. ते अविश्वास ठरावावर तोंडावर कसे आपटतात, हे गेल्या दोन दिवसांपासून सारा देश पाहतोय. पंतप्रधानांचे आणि एनडीएच्या घटक पक्षांचे स्थान या चर्चेनंतर अधिक बळकट होईल, यात मला तीळमात्र शंका वाटत नाही, असेही शिंदे आपल्या ट्विटमध्ये म्हणाले.

# महाराष्ट्र मणिपूरच्या दिशेने चालला ?

## » पत्रकाराला मारहाण प्रकरणी संजय राऊतांचा सवाल

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

**जळगावमधील पत्रकार संदीप महाजन यांना भर रस्त्यात मारहाण करण्यात आली. ही कोणत्या प्रकारची दादागिरी आहे, असा सवाल विचारतानाच ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी महाराष्ट्र मणिपूरच्या दिशेने चालला आहे की काय, असा प्रश्न निर्माण व्हायला लागल्याचे म्हटले आहे.**



### किशोर पाटील यांच्या कृत्याचा निषेध

» एखाद्या आमदाराने पत्रकारच काय पण जनतेतील कुठल्याही व्यक्तिशी अशा पद्धतीने बोलू नये. पाचोराचा राजकीय वारसा सुसंस्कृत आहे. यापूर्वीच्या नेत्यांनी तो कायम ठेवला आणि तो आताच्या नेत्यांनीही जपला पाहिजे. यापूर्वीही त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यासह टीका करताना आक्षेपार्ह वक्तव्य करत घाणेरडी भाषा वापरली होती. बाळासाहेब ठाकरे यांनी कधीही त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात इतक्या घाणेरड्या भाषेत कुणाला शिव्या दिल्या नाहीत. लोकप्रतिनिधींनी चांगल्या पद्धतीने काम करून लोकांपुढे आदर्श ठेवला पाहिले, असं म्हणत वैशाली सूर्यवंशी यांनी आपला आमदार भाऊ किशोर पाटील यांच्या कृत्याचा निषेध व्यक्त केला आहे.

शिंदे गटाचे आमदार किशोर पाटील यांनी काही दिवसांपूर्वी पाचोऱ्यातील पत्रकार संदीप महाजन यांना फोन करून शिवीगाळ केली होती. किशोर पाटील यांना पत्रकाराला हात-पाय तोडण्याची धमकीही दिली होती. याची ऑडियो क्लिपही व्हायरल झाली होती.

या धमकीनंतर आता पत्रकाराला भर रस्त्यात लाथा-बुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. खासदार संजय राऊत यांनी दिल्लीमध्ये माध्यमांशी बोलताना त्यांन महाराष्ट्रात भाजप राहुल गांधी यांनी दिलेल्या फ्लाईंग किसविरोधात आंदोलन करणार असल्याबद्दलचा प्रश्न विचारला. यावर उत्तर देताना ते म्हणाले की, जंतर मंतरला महिला



कुस्तीपटू बसल्या होत्या तेव्हा भाजपचे कोणी तिथे का गेले नाही? राहुल गांधींनी द्वेष, बदला यावर उतारा म्हणून संपूर्ण देशाला प्रेमाचा किस दिला. जादूची झप्पी असते तसा जादूका फ्लाईंग किस त्यांनी दिला. मोहब्बतच्या दुकानातील ते एक महत्त्वाचे शस्त्र आहे.

ज्यांना प्रेमाची सवय उरलेली नाही, ममत्व उरलेले नाही अशांना हे फ्लाईंग किस काय आहे हे कळणार नाही.

संजय राऊत यांची शिवसेनेच्या पॉडकास्ट अर्थात आवाज कुणाचामध्ये सविस्तर मुलाखत घेण्यात आली आहे. याचा एक प्रोमो प्रसिद्ध झाला असून यातील त्यांच्या ईडी ही दहशतवादी संघटना आहे एका वाक्याबाबतही राऊत यांना प्रश्न विचारण्यात आला. यावर उत्तर देताना ते म्हणाले की, ज्या गोष्टींचा तपास पोलिस , राज्याचा आर्थिक गुन्हे विभाग करू शकतो तिथे ईडी घुसवायची आणि केंद्र सरकारने त्यावर नियंत्रण ठेवायचं आणि विरोधकांना दडपशाहीच्या मार्गाने आपल्याकडे खेचायचे असे प्रयत्न सुरू आहे.

हे पाहिले तर अनेक केंद्रीय तपास यंत्रणा या दहशतवाद करत आहे. हे मी सांगत नसून हरीश साळवे यांनी सुप्रीम कोर्टात सांगितले आहे. ईडीला आवरले नाही तर देशात अराजक निर्माण होईल असे साळवे यांनी सर्वोच्च न्यायालयात म्हटले आहे.

### किशोर पाटील यांच्या कृत्याचा निषेध



» जळगाव जिल्ह्यात एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाला. या प्रकरणावरुन स्थानिक पत्रकाराने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर भाष्य करणारी बातमी केली. ही बातमी शिंदे गटाचे आमदार किशोर पाटील यांना चांगलीच झोंबली. आज पत्रकार संदीप महाजन यांना मारहाण केली. आमदारांच्या समर्थकांच्या गुंडगिरीचा राज्यभरातून निषेध होतोय. पत्रकाराला फोनवर आई- बहिणीवरून शिवीगाळ करायची, मारण्याची धमकी द्यायची, दुसऱ्या दिवशी त्या पत्रकाराला गुंड पाठवून मारहाण करायची, का? तर त्याने विरोधात बातमी छापली म्हणून... विशेष म्हणजे ज्या चौकात मारहाण झाली त्या चौकाला या पत्रकाराच्या स्वातंत्र्यसैनिक वडिलांचे नाव दिलेले आहे. ही घटना बघून स्वातंत्र्यासाठी झटणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांच्या डोळ्यात देखील नक्कीच पाणी असेल आदरणीय मुख्यमंत्री एकनाथ शिंदेसाहेब, सत्तेची नशा अशी असते का? लोकशाही मूल्यांना, स्वातंत्र्यासाठी झिजलेल्या कुटुंबांना देखील सन्मान नसतो का? हा प्रश्न आज सर्वसामान्य जनता विचारत आहे. असो, सत्ताधाऱ्यांकडून हीच अपेक्षा आहे. परंतु एका पत्रकाराला अशा प्रकारे मारहाण झाली असताना महाराष्ट्राच्या पत्रकारांनी साधा निषेध करण्याची हिंमत देखील केली नाही, हे मात्र नक्कीच अनपेक्षित आहे.

# भारताची अर्थव्यवस्था मजबुत

## जगभरातली परिस्थिती बिकट : निर्मला सीतारामण

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जगभरातले देश आर्थिक संकटातून जात आहे. परंतु, अशा काळातही भारताची अर्थव्यवस्था मजबुतीने उभी आहे, असं म्हणत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी देशातली वाढती महागाई आणि अर्थव्यवस्थेवरील प्रश्नावर लोकसभेत उत्तर दिलं. सीतारमण म्हणाल्या, “जगभरातली वाढती महागाई आणि घसरलेला विकास दर हा चिंतेचा विषय आहे. मी आता परदेशात काय चाललंय याची काही उदाहरणं देते.**

त्यानंतर मी आपल्या परिस्थितीवर बोलेन. २०२२ मध्ये जागतिक अर्थव्यवस्था केवळ ३ टक्क्यांच्या वर गेली आहे. जागतिक बँकेच्या मते २०२३ मध्ये जागतिक विकास दर २.१ टक्क्यांपर्यंत खाली जाईल. ब्रिटनमधली परिस्थिती सर्वात बिकट आहे.”, दरम्यान, यावेळी विरोधकांवर हल्लाबोल करत अर्थमंत्री म्हणाल्या, तुम्ही आश्वासनं देण्यात दंग राहिलात आणि आम्ही काम करण्यात व्यस्त राहिलो, त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचं चित्र बदललं आहे.



अर्थमंत्री निर्मला सीतारमण म्हणाल्या, जगभरातली परिस्थिती बिकट आहे. परंतु, त्यात चीन ही एक मोठी आणि वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. मी चीनच्या अर्थव्यवस्थेशी आपली तुलना करणार नाही. परंतु ज्या अर्थव्यवस्था मजबूत मानल्या जात होत्या, त्या आज ग्राहकांच्या कमतरतेशी झगडताना दिसत आहेत. चीन, ब्रिटन आणि पाठोपाठ अमेरिकेची अर्थव्यवस्थाही घसरली झाली आहे. त्यामुळे त्यांचा शेअर बाजार हादरला आहे. ही परिस्थिती पाहून तुम्ही आता भारताची अर्थव्यवस्था समजून घेतली पाहिजे. अर्थमंत्री म्हणाल्या, २०१३ मध्ये मॉर्गन आणि स्टॅन्लेने भारताला सर्वात कमकुवत अर्थव्यवस्थेंच्या यादीत समाविष्ट केलं होतं. त्याच मॉर्गन स्टॅन्लेने आज भारताला अव्वल स्थानी ठेवलं आहे. आज आपला देश सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपलं आर्थिक धोरण इतकं सुधारलं आहे की कोव्हिड संकटावर मात करून आपण नव्या ताकदीने उभे राहिलो आहोत आणि पुढे जात आहोत. निर्मला सीतारमण म्हणाल्या, जन धन योजना, डिजिटल इंडिया मिशन, आयुष्मान भारत, जन औषधी केंद्र, अशा योजनांचा सर्वांना फायदा झाला आहे. गेली सहा दशके आपण 'गरिबी हटाओ' असा नारा ऐकत होतो, पण तसं झालं का? परंतु, आता आपण गरिबी दूर केल्याचं चित्र तुम्ही पाहताय.

### तुम्ही फक्त स्वप्नं दाखवत होता

केंद्रीय अर्थमंत्री म्हणाल्या, पूर्वी आपण फक्त बनवू, उभारू, तयार करू असल्या घोषणा ऐकायचो, आता मात्र बनवलं, उभारलं, तयार केलं असं ऐकतोय. पूर्वी म्हणायचे, वीज मिळेल, आता लोक म्हणत आहेत वीज मिळालीय. पूर्वी म्हणायचे, पीएम आवास योजनेअंतर्गत घर बांधून मिळेल आता लोक म्हणत आहेत घरं बाधून मिळाली. पूर्वी म्हणायचे रस्ता बांधू, आता लोक म्हणत आहेत रस्ते बांधले. पूर्वी म्हणायचे विमानतळ बांधू, आता लोक म्हणत आहेत विमानतळं बांधली. पूर्वी म्हणायचे स्वस्त राशन मिळेल, आता जनता म्हणतेय स्वस्त राशन मिळतंय. तुम्ही (विरोधक) फक्त स्वप्नं दाखवत होता, परंतु आम्ही जनतेची स्वप्नं साकार करत आहोत.

# राजस्थानात जातनिहाय जनगणना होणार

## ओबीसी आरक्षण 27%, मूळ ओबीसींना स्वतंत्र 6% कोटा मिळेल

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**निवडणूक वर्षात मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी राजस्थानमध्ये जातनिहाय जनगणना करण्याची घोषणा केली आहे. तसेच, ओबीसी आरक्षण 21% वरून 27% आणि मूळ ओबीसींसाठी वेगळे 6% आरक्षण देण्याची घोषणा केली. बांसवाडा येथील मानगड धाम येथे जागतिक आदिवासी दिनानिमित्त आयोजित सभेत गेहलोत बोलत होते.**

गेहलोत बैठकीत म्हणाले- राहुल गांधी म्हणाले की, जातनिहाय जनगणना झाली पाहिजे, त्यामुळे संपूर्ण देशाला संदेश गेला. तुमच्या भावनांनुसार आम्ही राजस्थानमध्ये जात जनगणना सुरू करू इच्छितो. ज्याला जातीच्या आधारावर हक्क मिळेल, त्याला तो मिळेल. आम्हाला हा विचार पुढे न्यायचा आहे. सध्या राज्यात SC साठी 16%, ST साठी 12%, OBC साठी 21%, EWS साठी 10% आणि MBC साठी 5% आरक्षण आहे. ओबीसी आरक्षण 27% पर्यंत वाढवल्यानंतर, राजस्थानमध्ये 70% आरक्षण असेल. ओबीसी मतदारांना पसंती देण्यासाठी गेहलोत यांनी निवडणुकीच्या वर्षात मोठी घोषणा केली आहे. ओबीसी आरक्षण वाढवण्याची मागणी अनेक दिवसांपासून होत होती. हरीश चौधरी यांच्यासह अनेक काँग्रेस नेते ओबीसी आरक्षण 27% पर्यंत वाढवण्याची मागणी करत होते. ओबीसी आरक्षणाचे वर्गीकरण करण्याची मागणीही अनेक दिवसांपासून होत होती. विधानसभा निवडणुकीपूर्वी गेहलोत यांनी ओबीसी आरक्षण



वाढवून मूळ ओबीसींना वेगळे आरक्षण देण्याची घोषणा करून मोठा राजकीय जुगार खेळला आहे. विधानसभेत गेल्याच दिवसांत सरकारने जात जनगणनेबाबत ठराव करून केंद्र सरकारकडे पाठवला. या ठरावात केंद्र सरकारला जात जनगणना करून जुनी आकडेवारी सार्वजनिक करण्याची मागणी करण्यात आली होती. बिहार सरकार जातनिहाय जनगणना करत आहे. पाटणा उच्च न्यायालयाने या जनगणनेला स्थगिती दिली होती. नुकतीच सर्वोच्च न्यायालयाने ही बंदी हटवली आहे. जातनिहाय जनगणना सुरुवातीपासूनच वादात सापडली आहे. त्याला भाजपने विरोध केला आहे. काँग्रेस आणि त्यांचे मित्र पक्ष त्याला पाठिंबा देत आहेत.

यूपीए सरकारने 2011 मध्ये सामाजिक आर्थिक आणि जात जनगणना केली होती. सरकारने आर्थिक सामाजिक जनगणनेची आकडेवारी जाहीर केली होती, मात्र जात जनगणनेची आकडेवारी जाहीर केली नाही. विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेला तीन महिन्यांहून कमी कालावधी शिल्लक असताना मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी जात जनगणना करण्याची घोषणा केली आहे. इतक्या कमी कालावधीत जातनिहाय जनगणना पूर्ण होणे शक्य नाही. निवडणूक जाहीर होताच ती अडकण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्र्यांनी निश्चितपणे जात जनगणना करण्याची घोषणा केली आहे.

### मागास जातींचे सर्वेक्षण होणार : गेहलोत

ओबीसी आरक्षण वाढवून मूळ ओबीसी जातींना स्वतंत्रपणे 6 टक्के आरक्षण देण्याच्या घोषणेनंतर गेहलोत यांनी ट्विट करून स्पष्टीकरण दिले. गेहलोत यांनी लिहिले आहे – सध्या जारी केलेल्या इतर मागासवर्गीयांसाठी (OBC) 21% आरक्षणासह 6% अतिरिक्त आरक्षण दिले जाईल, जे OBC वर्गातील बहुतांश मागास जातींसाठी राखीव असेल. ओबीसी आयोग ओबीसी प्रवर्गातील सर्वात मागास जाती ओळखण्यासाठी सर्वेक्षण करेल आणि त्याचा अहवाल सादर करेल. त्यामुळे अत्यंत मागासलेल्या जातींना सरकारी क्षेत्रात शिक्षण आणि सेवेच्या अधिक संधी मिळणार आहेत. एससी-एसटीच्या विविध संघटना लोकसंख्येच्या आधारावर आरक्षणाची मागणी सातत्याने करत आहेत. सरकारही या मागणीची चाचपणी करत आहे. EWS श्रेणीसाठी 10% आरक्षणामध्ये, राजस्थान सरकारने स्थावर मालमत्तेची अट काढून टाकली होती, जेणेकरून या वर्गालादेखील आरक्षणाचा पूर्ण लाभ मिळू शकेल.

# सुष्मिता साकारणार गौरी सावंतची भूमिका

सुष्मिता सेनची बहुप्रतिक्षित वेब सिरीज 'ताली' 15 ऑगस्टला OTT वर रिलीज होणार आहे. यात सुष्मिता ट्रान्सजेंडर कार्यकर्त्या श्री गौरी सावंतच्या भूमिकेत दिसत आहे. सुष्मिता सेनने तिच्या कम्फर्ट झोनमधून बाहेर पडून या व्यक्तिरेखेसाठी तयारी केल्याचे खुद्द श्रीगौरी सावंतनेच सांगितले आहे. माझ्यासाठी आणि माझ्या समाजासाठी ही खूप अभिमानाची बाब आहे की पहिल्यांदाच एका ट्रान्सजेंडरची कथा दाखवली जात आहे. त्याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे कोणतीही सामान्य अभिनेत्री नाही तर मिस युनिव्हर्स सुष्मिता सेन स्वतः माझी भूमिका साकारत आहेत. सुमारे दीड वर्षापूर्वी, निर्मात्या आफिफा नाडियाडवाला, ज्या माझ्या मैत्रीणही आहेत, त्यांनी मला विचारले की, त्या माझ्यावर चित्रपट बनवू शकतात का? त्यावेळी मला खात्री नव्हती की, खरंच ती असे काहीतरी करेल. त्यावेळी मला वाटले की ती फक्त गंमत करत आहे. पण त्यानंतर तिने हा प्रोजेक्ट सुरू केला आणि जवळपास वर्षभरानंतर तो पडद्यावर येण्यासाठी सज्ज झाला आहे. गौरी सावंत म्हणाल्या- सुष्मिता सेनने माझी भूमिका साकारण्यासाठी खूप मेहनत घेतली आहे. मी त्यांच्याशी 7-8 वेळा संवाद साधला, आम्ही माझे व्हिडिओ एकत्र बघायचो. मी कशी बोलते, मी कशी चालते, मी कोणते कपडे घालते, इत्यादी समजून घेण्यासाठी आम्ही बोललो.



सुरुवातीला मला भीती वाटत होती की सुष्मिता माझी भूमिका वेगळ्या पद्धतीने साकारेल की काय? काही त्यांचे इनपुट असतील का? पण असे अजिबात झाले नाही. सुष्मिता अतिशय साधी आहे. कम्फर्ट झोनमधून बाहेर पडून तिने माझ्या पात्रासाठी तयारी केली आहे. ती सेटवर सगळ्यांना बेबी म्हणून हाक मारायची, ती कधीच तिच्या व्हॅनिटीत बसली नाही. ती सेटवर उपस्थित असलेल्या ट्रान्सजेंडर्ससोबत बसून जेवण करायची. जेव्हा आम्ही पहिल्यांदा भेटलो तेव्हा मी तिला विचारले की तुम्हाला ट्रान्सजेंडरची भूमिका करण्यास संकोच वाटत नाही का? तुम्ही माझी भूमिका का करत आहात? यावर त्यांनी हसून एकच उत्तर दिले - 'तू आई आहेस आणि मीही आई आहे', त्यांच्या या बोलण्याने मी खूप भावूक झाले आणि गौरी सावंतची भूमिका तिच्यापेक्षा चांगली कोणीही करू शकत नाही, याची मला खात्री पटली. एक सोडून आम्हा दोघींमध्ये बरेच साम्य आहे - तिला साप पाळणे आवडते आणि मला कुत्री. मी मालिका पाहिली नाही, पण प्रोमोमध्ये दाखवल्याप्रमाणे मी खोडकर आहे. बाकीच्याबद्दल, माझ्याबद्दल किती सांगितले गेले आहे याची मला पूर्णपणे माहिती नाही. फक्त हे जाणून घ्या की निर्मात्यांनी लहानपणापासून आतापर्यंत माझ्या आयुष्यावर लक्ष केंद्रित केले आहे. गायत्री माझ्या आयुष्यात कशी आली, मी घर सोडून समाजात कशी सामील झाले. ही सिरीज कधी प्रदर्शित होईल, हे माझ्यासाठीही सरप्राईज असेल. मला आशा आहे की या सिरीजमधून लोकांना समजेल की, आपल्या ट्रान्सजेंडर्सचे खरे आयुष्य कसे आहे. आजही समाजातील बहुसंख्य लोक आम्हाला परके समजतात. आपणही एका सामान्य घरात जन्मलो आहोत हे सांगण्याचा प्रयत्न करत आहोत. लोकांचा समाजाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलायला हवा. रॉयल्टी म्हणून, मला यासाठी निर्मात्यांनी पैसे दिले आहेत, ते मी माझ्या संस्थेच्या देणगीसाठी वापरले आहेत. दुःखाची गोष्ट म्हणजे 28 जुलै रोजीच मी माझ्या मोठ्या भावाविरुद्ध कायदेशीर खटला दाखल केला आहे. तो म्हणतो की मी त्याचा खरा भाऊ नाही. ते माझ्यावर बनावट ट्रान्सजेंडर असल्याचा आरोप करत आहेत. एवढेच नाही तर ते माझ्यावर खोटे सावंत आडनाव वापरल्याचा आरोपही करत आहेत. तुम्हीच विचार करा, अजून किती लढाया शिल्लक आहेत माझ्यासाठी? मी आता डीएनए चाचणीची मागणी करत आहे, आता मी पुढे काय करावे? मी सर्व पुरावे दिले आहेत, आणखी कोणी काय करू शकेल? आज माझ्यावर सिरीज बनवली जात आहे, मी समाजात एक ओळख निर्माण केली आहे, पण मी माझ्या कुटुंबातील सदस्यांसमोर माझी ओळख उघड करण्यासाठी पुरावे सादर करत आहे. जणू माझा संघर्ष संपण्याचे नावच घेत नाही.

## माझा सगळा माज उतरला

मराठी मनोरंजनसृष्टीतील आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक म्हणजे स्पृहा जोशी. तिच्या उत्तम अभिनय कौशल्यामुळे ती नेहमीच चर्चेत असते. अभिनयाबरोबर तिनं कविता, लेखन, सूत्रसंचालन आणि निरागस चेहरा यामुळे प्रेक्षकांची मन जिंकली आहेत. नाटक, मालिका, चित्रपट, वेब सीरिज या चारही माध्यमांमध्ये तिनं काम केलं आहे. अशा या गुणी अभिनेत्री म्हणून ओळख असलेल्या स्पृहानं एका मुलाखतीमध्ये न्यूज अँकरिंगचा अनुभव सांगितला. 'अमूक तमूक' या युट्यूब चॅनेलवर स्पृहानं नुकतीच मुलाखत दिली. यावेळी तिनं सांगितलं की," 'झी २४ तास' या वृत्तसंस्थेचा एक उपक्रम होता, तो आता त्यांनी बहुतेक बंद केलाय. एक सेलिब्रिटी न्यूज अँकर होऊन बातम्या सांगतो, हा त्यांचा उपक्रम होता. मी तिथे गेली होती. त्या दिवशी माझा सगळा माज उतरला. असं नाही की, मला टेलिप्रॉम्प्टर वाचायची सवय नाहीये. मला त्याची सवय आहे आणि मला ते येतं. पण त्या क्षणी त्या न्यूज रुममध्ये, त्या न्यूजचं प्रेशर घेऊन बरीच माणसं तुमच्या कानात काहीतरी सांगतायत. त्यात फम्बल (FUMBLE) न होणं हे अशक्य आहे आणि त्यात बऱ्याचदा चुकीचं लिहून येतं. त्यामुळे फम्बल होण्याची पूर्णतः शक्यता आहे. त्यामुळे ते फम्बल होत असतील तर ठीक आहे. न्यूज अँकरिंग हे काम खूप कठीण आहे. त्यावेळेस ते सांभाळून त्यांना या शिवायसुद्धा काहीतरी बोलायचं असतं. तुम्हाला फक्त बातमी वाचून चालत नाही, कनेक्शन तुमची तुम्हाला द्यायची असतात. मला 'झी २४ तास'च्या त्या कार्यक्रमात मज्जा आली.

## डॉन 3 मध्ये शाहरुखच्या जागी रणवीर सिंह

डॉन ३ च्या निर्मात्यांनी चित्रपटाच्या घोषणेनंतर डॉन ३ चा प्रोमो व्हिडिओ शेअर केला आहे. या चित्रपटात शाहरुख खानची जागा रणवीर सिंह घेणार आहे. व्हिडिओ शेअर करताना निर्मात्यांनी लिहिले, 'नव्या युगाची सुरुवात. फरहान अख्तर दिग्दर्शित या चित्रपटात रणवीर मुख्य भूमिकेत दिसणार आहे. प्रोमो व्हिडिओची सुरुवात रणवीरच्या आवाजाने होते, 'शेर जो सो रहा है, वो जागेगा कब? प्रत्येकजण विचारतो. त्यांना सांगा की मी पुन्हा जागा झालो आहे आणि लवकरच पुन्हा तुमच्यासमोर येईन. तुम्हाला माहीत आहे जे माझे नाव आहे 11 देशांचे पोलिस मला शोधत आहेत, पण मला कोणी पकडले आहे. मी डॉन आहे. याआधी मंगळवारी फरहान अख्तरने सोशल मीडियावर एक पोस्ट टाकून डॉन 3 ची घोषणा केली होती. त्यांनी एक लांबलचक नोट शेअर केली आणि लिहिले - 1978 मध्ये सलीम-जावेद यांनी एक पात्र तयार केले. मिस्टर बच्चन यांनी ती व्यक्तिरेखा खूप छान साकारली होती. चित्रपट पाहण्यासाठी चित्रपटगृहांमध्ये मोठी गर्दी झाली होती.

## रजनीकांतचे जपानी फॅन!

सुपरस्टार रजनीकांतचा जेलर सिनेमा आज सगळीकडे रिलीज झालाय. रजनीकांतचा सिनेमा पाहणं ही त्याच्या फॅन्ससाठी पर्वणी असते भारतातच नव्हे तर जगभरातल्या फॅन्सच्या मनात रजनीकांतच्या सिनेमाबद्दल वेगळीच क्रेझ असते. याचा अनुभव नुकताच आलाय. रजनीकांतचा सिनेमा पाहायला एक जपानी जोडपं चक्क भारतात आलं आणि त्यांनी थैलयवाच्या सिनेमाचा अनुभव घेतला. 'जेलर' सिनेमाची क्रेझ किती जास्त आहे, याची आपण कल्पनाच करु शकत नाही. कारण जेलरचा हँगओव्हर थेट जपानी प्रेक्षकांच्याही डोक्यावर आहे. जपानचे एक जोडपे भारतात आले आहे. थलैवाचा 'जेलर' एन्जॉय करण्यासाठी हे जपानी जोडपे तामिळनाडूला पोहोचले. जपानी जोडप्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे, ज्यामध्ये ते रजनीकांत यांच्यावरील प्रेम व्यक्त करताना दिसत आहेत. इंटरनेटवर व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये जपानमधील यासुदा हिदेतोशी (YASUDA HIDETOSHI) म्हणतात की, ते जेलर सिनेमा पाहण्यासाठी भारतात आले आहेत. ते सध्या चेन्नईत आहेत. हा व्हिडिओ रजनीकांत यांच्या फॅन पेजवरही शेअर करण्यात आला आहे. इतकंच नव्हे, तर यासुदा हिदेतोशी जपानमध्ये रजनीकांतचा फॅन क्लब चालवतात. ते या क्लबचे अध्यक्ष आहेत. 'जेलर'चे पहिल्या दिवशीचे बॉक्स ऑफिस कलेक्शन 11 ऑगस्टला समोर येईलच. पण ॲडव्हान्स बुकिंगचे आकडे पाहता, पहिल्या दिवशी जेलर सिनेमाची 42 कोटी रुपयांची कमाई होऊ शकते असा अंदाज आहे. 'जेलर'ने ॲडव्हान्स बुकिंगमध्येच सुमारे 13 कोटींचा व्यवसाय केला. विशेष म्हणजे रजनीकांत यांचा चित्रपट हिंदीत प्रदर्शित होत नाही.



# विश्वचषकासाठी तिलक वर्माला संधी ?

## » केएल राहुल, श्रेयस अय्यर दुखापतीतून सावरलेले नाहीत

**नवी दिल्ली ।**
**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

**भारताचा युवा फलंदाज तिलक वर्माने वेस्ट इंडिजविरुद्धच्या टी-20 मालिकेत चमकदार कामगिरी केली आहे. या मालिकेत तो आतापर्यंत सर्वाधिक धावा करणारा फलंदाजही आहे. तिसऱ्या सामन्यात तो ४९ धावा करून नाबाद राहिला. आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्सकडून खेळणाऱ्या तिलकचा विश्वचषकाच्या संघात समावेश करण्याबाबत आता अनेक दिग्गज बोलत आहेत. अशाच आता वसीम जाफरने तिलक वर्माबद्दल एक महत्त्वाच विधान केले आहे.**





वर्माचा विश्वषकासाठीच्या टीम इंडियाच्या संघात स्थान दिले जावे, यासाठी आर आश्विन ते माजी निवडकर्ते एमएसके प्रसादपर्यंत आग्रही आहेत. टीम इंडियाबद्दल बोलायचे झाले तर, आतापर्यंत केएल राहुल ते श्रेयस अय्यर दुखापतीतून पूर्णपणे सावरलेले नाहीत.

अशा स्थितीत २० वर्षीय तिलक वर्माला मधल्या फळीत संधी देण्याची चर्चा आहे. आता अजित आगरकर यांची निवड समिती तिलक वर्माला विश्वचषकात संधी देते की नाही हे पाहावे लागेल. माजी भारतीय यष्टीरक्षक एमएसके प्रसाद म्हणाले की, मला वाटते ही वाईट कल्पना नाही, जर श्रेयस अय्यरने संघात स्थान मिळवले नाही. त्यानंतरच तुम्ही तिलक वर्माचा विचार करू शकता, पण मला खात्री आहे की भविष्यात मर्यादीत षटकांच्या क्रिकेटमध्ये तो भारताचा नियमित खेळाडू असेल. भारताचा माजी क्रिकेटपटू वसीम जाफरही तिलकला विश्वचषकासाठी संघात स्थान देण्याच्या बाजूने दिसला. क्रिकइन्फोशी बोलताना वसीम जाफरने सांगितले की, "आता निर्णय घेण्याची वेळ आली आहे. कारण विश्वचषक सुरू होण्याआधी फक्त ९ सामने बाकी आहेत. तो म्हणाला की आदर्श परिस्थितीत खेळाडूला १५ ते २० सामने मिळावेत अशी आमची इच्छा आहे. श्रेयस आणि राहुल आशिया चषकासाठी तयार होतील अशी आम्हाला अपेक्षा होती, पण ते आशिया चषकासाठी तयार होऊ शकणार नाहीत हे आम्ही वाचत आहोत.

ते ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेसाठी उपलब्ध असतील की नाही हे आम्हाला माहीत नाही. कारण त्यांची दुखापत किती गंभीर आहे, हे आम्हाला माहीत नाही.

### तिलक वर्माची शानदारी कामगिरी

» जाफर म्हणाला की, तुम्हाला खेळाडूची चाचणी घ्यायची असेल, तर तिलक वर्मा का नाही? खेळणारा कोणताही खेळाडू पुरेसा तयार होणार नसेल, तर मग तिलक वर्मा का नाही. मी त्याच्यावर पैज लावेन. तिलक वर्माने आतापर्यंत वेस्ट इंडिजविरुद्ध खेळलेल्या तीनही टी-२० सामन्यात शानदारी कामगिरी केली आहे. ३० ऑगस्टपासून आशिया चषक आणि ५ ऑक्टोबरपासून विश्वचषक भारतात खेळवला जाणार आहे.

# ईडन गार्डन्स स्टेडियमला आग

## » ड्रेसिंग रुममध्ये ठेवलेले सामान जळून खाक

**नवी दिल्ली ।**
**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

**बंगाल क्रिकेट असोसिएशन अंतर्गत येणाऱ्या कोलकाता येथील ईडन गार्डन स्टेडियमवर एक मोठी दुर्घटना घडली आहे. वास्तविक, स्टेडियमच्या ड्रेसिंग रूमला आग लागल्याची घटना समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी रात्री उशिरा स्टेडियमच्या ड्रेसिंग रूममध्ये अचानक आग लागली. अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी पोहोचले, यानंतर बऱ्याच प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले, मात्र या घटनेत ड्रेसिंग रूमचे मोठे नुकसान झाले आहे.**



स्थानिक मीडिया रिपोर्ट्सनुसार, अग्निशमन विभागाला मध्यरात्री १२ च्या सुमारास स्टेडियमच्या ड्रेसिंग रूममध्ये आग लागल्याचा कॉल आला. अग्निशमन दलाच्या गाड्यांनी घटनास्थळी धाव घेत एक तासाच्या अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणली. प्राथमिक तपासात शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचे अग्निशमन विभागाकडून सांगण्यात आले आहे.

या अपघातात ड्रेसिंग रूमचे फॉल्स सिलिंग पूर्णपणे जळून खाक झाले आहे. यासोबतच तेथे असलेल्या वस्तूही जळून राख झाल्या आहेत. ईडन गार्डन्स स्टेडियमवर ५ ऑक्टोबरपासून विश्वचषकाचे आयोजन करायचे आहे. या स्टेडियमवर पहिला सामना २८ ऑक्टोबर रोजी नेदरलँड आणि बांगलादेश यांच्यात होणार आहे.

या मैदानावर टीम इंडियाचा वर्ल्ड कपमधील पहिला सामना ५ नोव्हेंबरला दक्षिण आफ्रिकेविरुद्ध होणार आहे. अलीकडेच आयसीसीचे पथक या स्टेडियममध्ये व्यवस्था पाहण्यासाठी आले होते.

### आयसीसी असेल चिंतेत

» काही दिवसांपूर्वी बंगाल क्रिकेट असोसिएशनने आयसीसीसमोर पाकिस्तान सामन्याबाबत सुरक्षा व्यवस्थेचा मुद्दा उपस्थित केला होता. बंगाल क्रिकेट असोसिएशनने पाकिस्तानच्या इंग्लंडविरुद्धच्या सामन्याच्या सुरक्षा व्यवस्थेवर आक्षेप घेतला होता. तो सामना दिवाळीच्या दिवशी होत आहे. बंगाल क्रिकेट असोसिएशनच्या त्या आक्षेपादरम्यान, आगीच्या या घटनेने आयसीसीचीही चिंता वाढवली असावी.

# संजू तू धावा कधी करणार?

**नवी दिल्ली ।**
**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

भारतीय यष्टीरक्षक फलंदाज संजू सॅमसनबद्दल नेहमीच असे म्हटले जाते की, ऋषभ पंत आणि केएल राहुलसारख्या खेळाडूंसोबतच्या खडतर स्पर्धेमुळे त्याला टीम इंडियामध्ये जास्त संधी मिळू शकल्या नाहीत. ज्यामुळे तो आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली छाप पाडू शकला नाही. प्रतिभा दाखवू शकत नाही. आता पाकिस्तानचा माजी क्रिकेटपटू दानिश कनेरियाचा असा विश्वास आहे की, सॅमसनला पुरेशा संधी मिळाल्या आहेत. पण तरीही तो टीम इंडियासाठी मोठी धावसंख्या करू शकलेला नाही.

भारतीय क्रिकेट चाहत्यांप्रमाणे कनेरियाही सॅमसनच्या कामगिरीत सातत्य नसल्यामुळे निराश झाला आहे. कनेरिया म्हणाला की, राजस्थान रॉयल्सच्या प्रतिभावान कर्णधाराने नियमितपणे धावा काढण्याची वेळ आली आहे. कनेरियाने आपल्या यूट्यूब चॅनलवर सांगितले की, "भारताने रोहित शर्मा आणि विराट कोहलीला विश्रांती दिली आहे, कारण काही खेळाडूंना पुरेशा संधी दिल्या जात नसल्याची तक्रार केली जात होती. आता भारताने त्यांना संधी दिली आहे, संजू सॅमसन, तू धावा कधी करणार? दानिश कनेरिया पुढे म्हणाला, "त्याच्याकडे आता पुरेशा संधी आहेत. मी अशा लोकांपैकी एक होतो, ज्यांनी त्याला पाठिंबा दिला आणि त्याला संधी मिळत राहावी अशी माझी इच्छा होती. मात्र, त्याने या संधींचा फायदा उठवला नाही." संजू सॅमसनने वेस्ट इंडिजविरुद्धच्या पाच सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या तीन सामन्यात केवळ १९ धावा केल्या आहेत, ज्यामध्ये त्याने पहिल्या सामन्यात १२, दुसऱ्या सामन्यात ७ धावा केल्या आणि तिसऱ्या सामन्यात त्याला फलंदाजीची संधी मिळाली नाही. भारतीय संघ व्यवस्थापन आगामी विश्वचषकापूर्वी संजू सॅमसन आणि सूर्यकुमार यादव यांना जास्तीत जास्त संधी देण्याचा प्रयत्न करत आहे.